# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २६/०५/२०२६ (मंगळवार )**

---

## मा. पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासाठी घेतली " सर्व कर्मचारी संवाद बैठक" (All Hands Meet)

आज दिनांक २६/०५/२०२६ रोजी पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिक्षक कार्यालय, तसेच पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन स्टाफ यांची **" सर्व कर्मचारी संवाद बैठक " (All Hands Meet) घेतली** . उपस्थित पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या अडीअडचणी, कामकाजासंदर्भातील विविध मुद्दे तसेच नवनविन कल्पना या विषयांवर चर्चा करण्यात आली. **सदर वेळी उपस्थित अधिकारी यांनी बैठकीदरम्यान गुन्हे तपासामध्ये महत्त्वपूर्ण ठरणारे रक्त नमुने व इतर जैविक पुरावे योग्य पद्धतीने जतन करता यावेत यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये फ्रीजरची सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देण्याच्या दृष्टीने पोलीस विभागात इलेक्ट्रिक वाहनांचा अधिकाधिक वापर करण्यात यावा, अशा विविध सूचना बैठकीत मांडण्यात आल्या. उपस्थितांच्या सुचनांची मा. पोलीस अधिक्षक यांनी दखल घेतली.** सदर बैठकीत पोलीस दलातील विविध पदावरील अधिकारी/अंमलदार यांच्या अनुभवाचा उपयोग करून पोलीस दलातील कामकाजात येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे, शिस्त व समन्वय राखणे याबाबत चर्चा करण्यात आली.

सदर सर्व कर्मचारी संवाद बैठकीस श्रीमती पुजा गायकवाड,पोलीस उपअधिक्षक (गृह),तसेच सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी, अंमलदार आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.






# नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग वरील सर्विस रोडवर अवैधरित्या वाहन पार्किंग करणाऱ्यांविरूध्द राबविण्यात येत आहे विशेष मोहीम

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग वरील सर्विस रोडवर अवैधरित्या वाहन पार्किंग करणाऱ्या विरूध्द दिनांक २५/०५/२०२६ पासून विशेष कारवाई मोहीम सुरू करण्यात आली आहे. सदर मोहीमे अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन तसेच जिल्हा वाहतुक शाखा यांच्याद्वारे राष्ट्रीय महामार्ग व सर्विस रोडवरील वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. विशेषता पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी परिसरात राबविण्यात आलेल्या या विशेष कारवाईमुळे अवैध पार्किंगच्या प्रकारांमध्ये लक्षणीय घट झाली असून, सदर परीसरात ७१ वहानांवर कारवाईत करण्यात आलेली असुन वाहतूक अधिक सुरळीत व सुरक्षित होण्यास मदत झाली आहे.

**या मोहिमेचा मुख्य उद्देश वाहतुकीचा सुरळीत प्रवाह कायम ठेवणे, अपघातांना प्रतिबंध करणे तसेच रस्ते सुरक्षेला प्राधान्य देणे हा आहे. तसेच, सदर मोहिमेदरम्यान दिनांक २५/०५/२०२६ पासुन ते दिनांक २६/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैधरित्या वाहन पार्किंग करणाऱ्या एकुण ३९६ वाहनांवर कलम १२२/१७७ मोटर वाहन कायदयान्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर विशेष मोहीम पुढील काळातही सातत्याने सुरू राहणार असून, सर्विस रोड व राष्ट्रीय महामार्गावर अवैधरित्या वाहन पार्किंग करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.**









ASHOK LEYLAND




NP



# पोलीस स्टेशन सावनेर येथे घेण्यात आले दंगा नियंत्रण योजनेचे प्रात्यक्षिक आणि रूट मार्च

आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत गांधी चौक येथे आज दिनांक २६/०५/२०२६ रोजी १७:०० ते १९:०० वाजेपर्यंत दंगा नियंत्रण योजनेचे प्रात्यक्षिक (मॉकड्रिल) आणि रूट मार्च आयोजित करण्यात आले होते. सदर मॉकड्रिलद्वारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी ढाल ,लाठी, हेल्मेट सह सज्ज होवुन आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देणे, जमाव नियंत्रण, दंगल परिस्थिती हाताळणे तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांची प्रात्यक्षिके केली.

**सावनेर शहरातील मुख्य रस्त्यावरून रूट मार्च काढण्यात आला. सदर रूटमार्च हा नगरपरिषद क्रीडा ग्राउंड सावनेर ते होळी चौक ते जामा मस्जिद ते मडकी चौक ते जयस्तंभ चौक ते गडकरी चौक ते गांधी चौक ते पोलीस स्टेशन पर्यंत घेण्यात आला. रूट मार्च नंतर गांधी चौक, सावनेर येथे मॉकड्रिल घेण्यात आली. मॉकड्रिल दरम्यान पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी दंगल नियंत्रण साहित्य, सुरक्षा उपकरणे तसेच शस्त्रसामग्रीसह विविध परिस्थितींवर नियंत्रण मिळविण्याचा सराव केला. तसेच सणोत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवणे, अफवांवर नियंत्रण ठेवणे या सारख्या तत्काळ कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.यावेळी नागरिकांनी सणोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करावा, कायदा व सुव्यवस्था अवाधित राखावी तसेच कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले.**

सदर दंगा नियंत्रण योजनेचे प्रात्यक्षिक – मॉक ड्रिल आणि रूट मार्च मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात सावनेर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन (सावनेर,कळमेश्वर, खापा, केळवद ) येथील अधिकारी व अंमलदार, पोलीस मुख्यालय येथील दंगा नियंत्रण पथकाचे पोलीस अंमलदार आणि राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ चे अधिकारी आणि अंमलदार तसेच होमगार्ड यांनी यशस्वीरित्या पार पाडले. **सदर दंगा नियंत्रण प्रात्यक्षिक आणि रूट मार्च मध्ये एकुण ६ पोलीस अधिकारी ,४९ पोलीस अंमलदार, राज्य राखीव पोलीस बल गट चे १ अधिकारी आणि २५ अंमलदार तसेच होमगार्ड हजर होते.**


जामा मस्जिद सावनेर
मस्जिद पार्किंग










तुम्हारा जमाव गैर कानूनी है.
MAHARASHTRA POLICE

# पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत अस्वलाच्या मृत्यु प्रकरणी तिघांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन देवलापार :—** पोलीस स्टेशन देवलापार हद्दीतील उमरी, ता. रामटेक परिसरात वन्यजीव अस्वलाचा विजेच्या प्रवाहामुळे मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी जयदेव रायसिंग सलामे, वय ३६ वर्षे, रा उमरी ता रामटेक याने आपल्या मका व धानाच्या शेताभोवती तार लावून त्यावर अवैधरित्या विद्युत प्रवाह सुरू केला होता. दिनांक १५/०५/२०२६ रोजी जंगली अस्वलाला विजेचा धक्का लागून त्याचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. सदर घटना उघड होऊ नये व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपी जयदेव सलामे याने त्याचे साथीदार आरोपी नामे अविनाश यशवंत कोकोडे व हमेशलाल हमीलाल उईके, सर्व रा. उमरी, ता. रामटेक यांच्या मदतीने अस्वलाचे प्रेत शेतातील गड्ड्यात पुरल्याचे निष्पन्न झाले. दिनांक २२/०५/२०२६ रोजी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी भेट देऊन चौकशी केली. आरोपींकडे विचारपूस केली असता त्यांनी शेताभोवती बारीक तारांवर विद्युत प्रवाह सोडल्यामुळे अस्वलाचा मृत्यू झाल्याची कबुली दिली.

**नमुद प्रकरणी आरोपी १) जयदेव रायसिंग सलामे ,वय ३६ वर्षे, २) अविनाश यशवंत कोकोडे, ३) हमेशलाल हमीलाल उईके, सर्व रा. उमरी, ता. रामटेक यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम १२५, ३२५, २३८(क), ३(५) भारतीय न्याय संहिता सह कलम कलम २(३६), २(१६), ९, ३९, ५१ वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ सहकलम १३५ भारतीय विद्युत कायदा अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०७ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २५/०५/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा मारोडी शिवार नहराजवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान संशयित महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच ४०/सी एस ८५०१ येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबवुन वाहनाची तपासणी केली असता चालक नामे **१) विक्की पंढरी सेलोकर, वय २३ वर्ष, रा. कोंडा, ता. पवनी, ता. मौदा, जि. नागपुर हा मिळुन आला आणि आरोपी २) प्रकाश बोरकर, रा. खराडा पुनर्वसन, ता. मौदा, जि. नागपूर** हा घटनास्थळावरून पसार झाला. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०७ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन कत्तलीकरीता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच ४०/सी एस ८५०१ किंमती ६,००,०००/—रूपये, आणि ०७ गोवंश जनावरे किंमती ७०,०००/—रूपये, असा एकुण ६,७०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.नमुद प्रकरणी आरोपीयांचेविरूद्ध कलम ११(१), (ड), (इ) (फ) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६०, सहकलम ५, ५(अ), (१), ९, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद. एकुण १६१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २५/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण १,६१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे लिलाधर भागवत डहाके, रा. झिल्पा, ता. काटोल, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे तिलक चद्रभान गोलाईत, वय ५८ वर्ष, रा. झेंडा चौक पहिलेपार सावनेर, ता. सावनेर याचेवर ०१

गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे यशवंत भालेराम सेलोकर, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, मांढळ तह. कुही याचेवर ०१ गुन्हा नोंद.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ८५९ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २६/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ८५९ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३६ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १३ आरोपी अशा एकुण १६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ९० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३५ आरोपी अशा एकुण १९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १६ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५६ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३८ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण १५४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४१ आरोपी अशा एकुण १८२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ८५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने